# गुरूंचे वागणे, कार्य आणि गुरुपरंपरा

## अनुक्रमणिका

( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )


**१. शिष्याला ज्ञान देण्याच्या दृष्टीने गुरूंचे महत्त्व** **१३**

**२. गुरूंचे वागणे** **१३**

२ अ. सर्वसाधारण वागणे १३

२ आ. संतांशी वागणे ३०

**३. गुरूंचे कार्य** **३१**

३ अ. अध्यात्मप्रसार ३१

३ आ. गुरु खरंच काही करतात का ? ३६

**४. भंडारा** **४१**

४ अ. अन्नदान ४१

४ आ. सेवा ४१

४ इ. त्याग ४२

४ ई. दुसऱ्यांविषयी प्रेम वाटणे ४२

४ ऊ. सत्संग ४२

**५. भ्रमण** **४३**

५ अ. उद्देश ५ आ. शिष्याला होणारे लाभ ४३

**६. तीर्थयात्रा** **४५**

**७. गुरु आणि इतर** **४६**

* गुरु आणि गुरूंचे कुटुंबीय * शिक्षक आणि गुरु ४६

* प्रवचनकार आणि गुरु ५०

* सर्वसाधारण व्यक्ती, साधक आणि गुरु ५०

* संत आणि गुरु * ईश्वर आणि गुरु ५०

**८. गुरूंना बुद्धीने जाणून घेणे अशक्य असल्याची कारणे** **५८**

**९. गुरूंची इतर गुरूंशी तुलना केल्याने साधनेत उन्नती न होणे** **५९**

**१०. गुरूंच्या दृष्टीकोनातून गुरु !** **६२**
* गुरु कोणाला गुरुपदावर बसवतात ? ६२
* स्वतःच्या गुरुपदाविषयी विचार ६३
* स्वतःच्या बोलण्याविषयी विचार ६३
* आशीर्वाद देतांनाचा भाव ६४
* गुरूंचा शिष्यभाव ६४
* गुरु-शिष्य नात्याविषयी दृष्टीकोन ६४
* गुरूंच्या दृष्टीने गुरुपौर्णिमा ६४
* गुरुपणाचे दायित्व ६५

**११. गुरुपरंपरा** **६५**
११ अ. शिष्याला होणारे साहाय्य ६५
११ आ. परंपरा खंडित होणे ६५

**१२. गुरूंची गादी आणि गुरुपादुका** **६७**

**१३. गुरूंची संख्या आणि भारताचे महत्त्व** **६८**

**१४. गुरुकृपायोगाची इतर योगमार्गांशी तुलना** **६९**

**- गुरूंविषयी टीका वा अयोग्य विचार आणि त्यांचे खंडण !** **७३**

## मनोगत

‘ज्ञानियांचा राजा गुरु महाराव’, असे संत ज्ञानदेवांनी म्हटले आहे. ज्ञान देतात, ते गुरु ! शिळेपासून शिल्प बनू शकते; पण त्यासाठी शिल्पकार लागतो. त्याचप्रमाणे साधक आणि शिष्य ईश्वराला प्राप्त करू शकतात; पण त्यासाठी गुरूंची आवश्यकता असते. गुरूंनी आपल्या बोधामृताने साधक आणि शिष्य यांचे अज्ञान दूर केल्यावरच त्यांना ईश्वरप्राप्ती होते.

साधक आणि शिष्य यांनी साधना करतांना त्यांनी काय केले पाहिजे, काय त्यागले पाहिजे आदींची जाणीव गुरु करून देतात. केवळ उपदेशातूनच नव्हे, तर सर्वसाधारण वाटणाऱ्या वागण्या-बोलण्यातूनही गुरु बरंच काही शिकवतात. साधक आणि शिष्य यांना गुरूंच्या वागण्याबोलण्याचा भावार्थ न कळल्यास ते गुरूंच्या अमूल्य विचारधनाला मुकतात. प्रस्तुत ग्रंथात

गुरूंच्या वागण्याविषयीचा (उदा. गुरूंचे सर्वसाधारण बोलणे, गुरूंचे ओरडणे) आणि ते शिष्याला करत असलेल्या साहाय्याविषयीचा उहापोह केला आहे.

शिक्षक, देवता अन् गुरु यांत कोणता भेद आहे ? गुरु त्यांच्यानंतर कोणाला गुरुपदावर बसवतात ? 'भारत' हा जगाचा 'आध्यात्मिक गुरु' का आहे ? आदींचाही या ग्रंथात ऊहापोह केला आहे.

'देवा तूची गणेशु । सकल मती प्रकाशु ।।', अशी संत ज्ञानदेवांनी प्रार्थना केली आहे. देवासमान अशा श्री गुरूंनी शिष्याची मती प्रकाशमान केल्याविना शिष्याला गुरूंकडून ज्ञान ग्रहण करणे किंवा शिकणे शक्य होईल का ?

'या ग्रंथाद्वारे जिज्ञासू, साधक आणि शिष्य यांना साधनेसाठी आवश्यक ज्ञान चांगल्या प्रकारे आत्मसात करता येवो आणि त्यांचा प्रवास शीघ्रतेने ईश्‍वरप्राप्तीच्या दिशेने होवो', अशी श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**